

# भोपाळ नरसंहार

दीप्ती काबाडे

# भोपाळ नरसंहार

दीप्ती काबाडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# भोपाळ नरसंहार

लेखिका : दीप्ती काबाडे

http://shodhastitvacha.blogspot.com/

d.a.kabade@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन  :८ मार्च २०१७ (आंतरराष्ट्रीय महिला दिवस)

©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

Bhopal, India 3 December 1984. Shortly after midnight, In the city of Bhopal, a poisonous gas called methyl isocyanate(MIC) leaked from the pesticide plant of Union Carbide India Limited 3,800 people died that night. Another 10,000 died over the next three days, and several hundred thousand more fell ill over the following years, Many of those survived suffered permanent disabilities.

**This is regarded as the world's worst industrial disaster ever.**

या पुस्तकातील एकही प्रसंग, व्यक्ती व स्थळ काल्पनिक नाही.

भारतात भोपाळ दुर्घटना ... भाग पहिला

# संहाराची नांदी ...

1940-50 च्या काळात डीडीटी या कीटकनाशकामुळे पिकांचे आणि पर्यावरणाचे होणारे नुकसान सर्वांच्या लक्षात आले होते. जागतिक बाजारपेठेत या कीटकनाशकावर बंदी घालण्यात आली. अमेरिकेतही ही बंदी लागू करण्यात आली होती.शास्त्रज्ञांनी पर्यायी आणि कमी धोकादायक कीटकनाशकांचा शोध घेण्यास सुरुवात केली . आणि 1956 साली त्यांना सेव्हिन बनवण्यात यश आले. अनेक कंपन्या हे कीटकनाशक बनवण्यासाठी पुढे सरसावल्या. त्यात ' युनियन कार्बाईड ' ही सर्वात मोठी कंपनी होती.

त्या काळात अमेरिकेच्या मॅनहॅटन मध्ये असणारी ही कंपनी जवळपास सर्वच क्षेत्रात अग्रेसर होती. अमेरिकेतल्या दहा पैकी आठ स्त्रिया बाजारात जाताना युनियन कार्बाईड चा लोगो असणाऱ्या पिशव्या वापरात असत. हाच लोगो प्लॅस्टिकच्या पाण्याच्या बाटल्या , अन्नाचे हवाबंद पॅकेट्स यांवरही असे ! सेव्हिन बनवण्याचे काम कार्बाईडने हाती घेतल्यानंतर संपूर्ण अमेरिकेत त्याची जोरदार जाहिरातबाजी करण्यात आली... " हे सर्व प्रकारच्या पिकांवर काम करते , घरात फवारल्यास मच्छर , झुरळं , ढेकूण हेही मरतात आणि गुरांच्या अंगावर फवारल्यास त्यांच्या अंगावरील गोचीड मारतात. परंतु गुरांना काही होत नाही असं या जाहिरातीत म्हटलं होता. एकंदर सेव्हिन मनुष्याला अजिबात हानिकारक नाही अशी जाहिरात केली गेली...

पुढच्या दहा वर्षांतच हे विष अमेरिका आणि दक्षिण अमेरिकेच्या सर्व भागांत पोहोचले. कंपनीत काम करणाऱ्या 'मुनोझ ' या अभियंता आणि विक्रेत्याला अमेरिका अपुरा पडू लागला . आपली हौस भागवण्यासाठी तो इतर देश शोधू लागला...

दरम्यान जर्मन विष वैज्ञानिकांनी सेव्हिन बनवण्यासाठी लागणाऱ्या मिथाईल आयसोसायनेट (एमआयसी ) आणि फॉस्जिन या घटकांचा अभ्यास केला. हे दोन्ही घटक अत्यंत घातक आहेत हे लक्षात आल्यानंतर इतर अनेक कंपन्यांनी या उत्पादनातून माघार घेतली. आणि कार्बाईडला रान मोकळे झाले !

जास्तीत जास्त विक्रीसाठी हपापलेला मुनोझ जून 1966 मध्ये दिल्लीत आला. अत्यंत चलाख बुद्धीच्या मुनोझने आधी इथला अंदाज घेतला. भारतात डीडीटी मुळे फार नुकसान झाले होते. शिवाय डीडीटी वर बंदी आणल्यामुळे पिकांना रोगाचा मारा सहन करावा लागत होता . भारताला तातडीने कीटकनाशकांची गरज होती. कृषी मंत्रालयात जवळपास शंभर जणांच्या बैठकीत त्याने सेव्हिन चे फायदे , कमीतकमी दुष्परिणाम हे मुद्दे जोरदार लावून धरले . परिणामी त्याने पहिली लढाई जिंकली ! 1200 टन सेव्हिन ताबडतोब अमेरिकेतून आयात करण्यात यावे आणि त्याबदल्यात येत्या पाच वर्षांत युनियन कार्बाईडने भारतात कारखाना उभारावा ... असा करार झाला !

भारतात कीटकनाशकांचा इतका मोठा कारखाना उभारण्यासाठी जागा मिळवणं हा सर्वांत मोठा प्रश्न होता . अनेक ठिकाणी स्वतः फिरूनही तो कोणत्याही निर्णयाला येत नव्हता.

आणि एक दिवस अचानक जून 1967 मध्ये 'संतोष दीनदयाळ ' नावाचा एक दलाल इसम स्वतःहून त्याच्या ऑफिसमध्ये आला . भारतातल्या अनेक उद्योगधंद्यांची दलाली मी करतो ... मी तुमच्या कारखान्यासाठी उत्कृष्ठ जागा मिळवून देतो असे आश्वासन त्याने दिले ...

संतोष म्हणाला " इन द हार्ट ऑफ इंडिया ... भोपाल " या ठिकाणची काळे मैदान म्हणून ओळखली जाणारी जमीन त्याने सुचवली. मुनोझच्या मनात ते शब्द घुमत होते ...इन द हार्ट ऑफ इंडिया ... परंतु प्रत्यक्ष त्याने भोपाळमध्ये येऊन ती जमीन पाहिल्यावर त्याच्या लक्षात आले की ही जागा अगदीच मध्यवर्ती भागात आहे. मनुष्यवस्तीच्या मध्यभागी . त्याने भविष्यातला धोका ओळखून मनुष्यवस्तीपासून दूर एखादी जागा शोधण्याचा सल्ला दिला. परंतु कार्बाईडच्या अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना नेमकी हीच जागा पसंत पडली ... आणि मुनोझचा नाईलाज झाला. त्याने मान्यता दिली !

त्या जमिनीवर जुन्या नवाबाचा भव्य राजवाडा होता . इंदिरा गांधींना अशा राजवाड्यांबद्दल फारशी आस्था नव्हती. त्या नवाबाच्या वंशजावर राजकीय दबाव टाकण्यात आला की त्याने राजवाडा विकावा आणि त्याबदल्यात दरमहा तनखा घ्यावा . नवाब तयार झाला ! शिवाय कंपनीला दरमहा पाच हजार टन सेव्हिन बनवण्याचा परवाना मिळाला !!!

राजवाडा पाडण्यात आला आणि त्याजागी कीटकनाशकांचा कारखाना उभारण्याची जय्यत तयारी सुरु झाली ! अगदी पाच वर्षात नाही , परंतु आठ दहा वर्षांत तो महाकाय कारखाना सुरूही झाला !!! मनुष्यवस्तीच्या मध्यावर ... इन द हार्ट ऑफ इंडिया ... भलामोठा मनुष्यसंहार करण्यासाठी ....

भोपाळ दुर्घटना ... भाग दुसरा

# चढता सूरज धीरेधीरे ....

कारखाना सुरु तर झाला होता. परंतु सेव्हिन बनवण्यासाठी लागणारे एमआयसी तयार करण्यासाठी अजूनही हा कारखाना पुरता तयार नव्हता . त्यामुळे सुरुवात करण्यासाठी एमआयसी थेट अमेरिकेतून बोटीद्वारे भारतात आणण्याचे ठरले.1976 साली मुंबईतल्या हाजी बंदर मध्ये एमआयसी उतरले. अमेरिकेतल्या कार्बाईडमधून नीट प्रशिक्षण घेऊन आलेला कमल पारीख हा उमदा तरुण अभियंता या क्षणाची वाटच पाहत होता ! एमआयसी मुंबई बंदरात पोहोचल्याचं समजताच तो तातडीने एका सहकाऱ्यासह स्वतः मुंबईत आला. एमआयसीचे सोळा ड्रम  बंदरात उतरवले होते. प्रत्येक ड्रममध्ये 150 लिटर . एमआयसी होते. एका ड्रमच्या झाकणाकडे कमल ला बुडबुडे येताना दिसले !!! तो जीवघेण्या भीतीने ड्रमकडे धावला... पाण्याच्या एका थेंबानेही इथे हाहाकार होऊ शकतो हे त्याला माहित होते. त्वरित सुरक्षा मुखवटा चढवून त्याने गोंद लावून तो ड्रम सील केला... त्याने तसं केलं नसतं तर भोपाळ मध्ये 1984 ला होऊ घातलेली घटना 1976 ला मुंबईत घडली असती ...

हे सोळा ड्रम दोन ट्रकमध्ये भरले गेले.कमलची कार या दोन ट्रकच्या पुढे चालत होती. रस्त्याने प्रवास करून त्याला हे ट्रक भोपाळपर्यंत न्यायचे होते ! मधेच तापमान वाढल्यासारखे वाटल्यावर तो स्वतः ट्रकमध्ये चढून इन्स्युलेटर कव्हर्स चढवत होता . सलग 38 तास प्रवास

करून ते ट्रक भोपाळच्या कारखान्यात दाखल झाले. हेच एमआयसी वापरून कंपनीने सेव्हिन चा श्रीगणेशा केला ...

4 मे 1980 या दिवशी कारखान्यात एमआयसी बनवण्याचा प्रयोग यशस्वी झाला . हा दिवस एखाद्या सणासारखा साजरा केला गेला. अमेरिकेतल्या युनियन कार्बाईडचा तेव्हाचा अध्यक्ष अँडरसन हा स्वतः या सोहळ्याला हजर होता.

वूमर या अमेरिकन अभियंत्याला भारतातल्या कारखान्याचा प्रमुख म्हणून नेमण्यात आले. सुरक्षा यंत्रणांच्या बाबतीत तो अत्यंत काटेकोर होता. कमल पारिखला त्यानेच आपल्या अमेरिकेतल्या कारखान्यात प्रशिक्षण दिले होते. तो भारतातल्या लोकांच्या कामाच्या पद्धती पाहून चक्रावून जाई. गॉगल नाही ... मास्क नाही... ग्लोव्हस ही नाहीत ! त्याने सर्व सुरक्षा यंत्रणा कडक केल्या. "एमआयसीचा प्रत्येक थेंब कोणत्याही परिस्थितीत 0डिग्री तापमानालाच साठवायचा" तो हे वारंवार ओरडून सांगायचा ! आणि त्याची एकच सूचना सतत असायची. एमआयसी कमीत कमी प्रमाणात साठवा... परंतु प्रत्यक्षात मात्र प्रत्येकी 150 टन च्या एकूण तीन टाक्या बसवण्यात आल्या होत्या !!! त्या टाक्या बघूनही त्याला धडकी भरे ...

23 डिसेंबर 1981 या दिवशी फॉस्जिन युनिट मध्ये काम करणाऱ्या 32 वर्षीय मुहम्मद अश्रफ याच्यावर फॉस्जिनच्या पाईपचा व्हॉल्व दुरुस्त करण्याचे काम होते. त्याने झडप दुरुस्त केली. परंतु ते करताना काही थेम्ब त्याच्या स्वेटरवर उडाले.

त्याने ताबडतोब शॉवर खाली धाव घेतली. परंतु त्याच्याकडून एक चूक झाली. फॉस्जिन पूर्णपणे धुवून जाण्याआधीच त्याने फेस मास्क काढला. फॉस्जिनचे उष्णतेमुळे गॅस बनलेले थेंब त्याच्या नाकात गेले. थोडा वेळ जळजळ होऊन नंतर त्याला बरं वाटलं ... परंतु फॉस्जिन हे स्लो पॉयझन आहे ! त्या रात्रीच त्याचा मृत्यू झाला!!! कारखान्याने आपला पहिला बळी घेतला होता ...

10 फेब्रुवारी 1982 रोजी पुन्हा लहानसा अपघात झाला. फॉस्जिनची गळती होऊन 25 जणांना विषबाधा झाली. परंतु सुदैवाने ती गळती प्राण घेण्याइतकी नव्हती. सर्वांना उपचाराने वाचवण्यात आले.

हवामानाच्या बदलामुळे पिकाचे प्रमाण कमी झाले होते. त्यामुळे भारताला आता सेव्हिन ची जास्त गरज लागत नव्हती . कारखान्यातले काम हळूहळू कमी व्हायला लागले.

1980 ते 1982 या काळात छोटेमोठे पाचसहा अपघात झाले. एकदा एका भागाला आग लागली. एकदा कंपनीच्या सांडपाण्याची बनलेल्या डबक्यातले पाणी पिऊन काही गुरे मेली ... कंपनीने आसपासच्या विहिरीतील पाण्याची चाचणी घेतली. सर्व चाचण्यांचा रिपोर्ट एकच सांगत होता ... पाणी पिण्याच्या योग्यतेचे नाही !!! परंतु कंपनीने या रिपोर्टबद्दल गुप्तता राखली !

6 डिसेंबर 1982 या दिवशी वूमर अमेरिकेला परत गेला. जाताना दोनच सूचना देऊन गेला. काम चालू नसतानाही एमआयसी 0 डिग्री तापमानालाच साठवा ... आणि कमीत कमी साठवा !!!

वूमर गेल्यानंतर त्याच्याजागी डी. एन . चक्रवर्ती नावाचा बंगाली माणूस अधिकारीपदी आला. कमल सांगतो ," या चक्रवर्तीला रसायनांबद्दल काहीच माहिती नव्हती. प्लान्टवर फिरताना तो डिझनी लँड मध्ये फिरल्यासारखा फिरत होता. " या मूर्ख माणसाने 1983 साली कंपनीचे पैसे वाचवण्याचा एक सोपा मार्ग शोधून काढला ... " कामच नाही तर सुरक्षा कशाला हव्यात ?" असं नसलेलं डोकं चालवून त्याने एमआयसी च्या टाक्या थंड ठेवण्यासाठी लागणारा फ्रेयॉन वापरणं बंद केलं .... एमआयसी आता हिवाळ्यातल्या थंडीत 20 डिग्री तापमानाला होतं . भरीत भर म्हणून त्याने धुरांड्याच्या वर असणारी सतत जाळणारी ज्योतही विझवली ! या ज्योतीचे काम जर चुकून गळती झालीच तर सर्व विषारी वायू हवेत मिसळण्यापूर्वीच जाळून टाकण्याचे असते ! ज्योत विझवून त्याने शेवटची आशा विझवली होती... ज्या कमलने सतत सुरक्षेचा ध्यास धरला त्याला हे सर्व पाहणे शक्यच नव्हते ! 13 डिसेंबर 1983 रोजी कमलने राजीनामा दिला . कंपनीचा शेवटचा आधार निखळला होता...

2 डिसेंबर 1984 या दिवशी तीन टाक्या पुढीलप्रमाणे एमआयसी ने भरलेल्या होत्या.

पहिली टाकी 42 टन

दुसरी टाकी 20 टन

तिसरी टाकी 1 टन

त्या दिवशी 19 वर्षांचा रहमान खान हा वर्कर दुसऱ्या पाळीवर होता. ए. व्ही. वेणुगोपाल या सुपरवायझर ने त्याला बोलावून घेतले. सेव्हिन तयार करण्याच्या रिएक्टरचे एमआयसी पर्यंत जाणारे पाईप गंजले होते. ते पाण्याने धुण्याचे काम रहमान कडे सोपवण्यात आले. प्रक्रिया त्याला लिहून देण्यात आली. " आधी सर्व झडपा बंद करून मगच रिएक्टर मध्ये पाणी सोडावे. सर्व आउटलेट मधून पाणी निघून पाईप पूर्ण साफ होईपर्यंत पाणी सोडत राहावे ..." यात एक सूचना राहून गेली. झडपा बंद करताना त्यात मेटल डिस्क टाकून झडप पूर्ण बंद झाल्याची खात्री करावी ...

रहमान ने सगळया झडपा बंद केल्या. गंजलेल्या अवस्थेतील त्या झडपा बंद झाल्या की नाहीत याची खात्री मात्र त्याला झाली नव्हती . " देखते है , क्या होता है " असा विचार करून त्याने पाणी सुरु केले. चार आउटलेट पैकी फक्त तीनच आउटलेट मधून पाणी बाहेर येत होते. त्याला गडबड वाटली. त्याने ताबडतोब जाऊन वेणुगोपाल ला बोलावून आणले. झोपमोड झाल्याने वैतागतच तो आला. म्हणाला , " अरे कचरा होगा . पानी छोडते रहो. साफ होजाएगा तो आउटलेट से बाहर आएगा " रहमानने सूचना पाळल्या ... आठ वाजता त्याने पाणी सुरु केले होते. साडेदहा वाजता त्याने विचारले ," साहब , पानी बंद करू या चालू रखू ?" सुपरवायझर म्हणाला , " सफाई अच्छा होना चाहिए . पानी चालू रख और तू घर जा !"

रहमान घरी निघून गेला ... पाणी चालू ठेऊन ... ती चौथी आउटलेट चालू झालीच नाही ... कारण त्याची नादुरुस्त झडप ते सर्व पाणी एमआयसी च्या टाकीत सोडत होती... त्याच एमआयसी मध्ये ज्याला पाण्याच्या थेंबाने स्पर्श केला तरी हाहाकार होईल या भीतीने कमलने मुंबईत स्वतःचा जीव धोक्यात घातला होता ... हळूहळू पाणी टाकीत शिरत होते... मृत्यूचे थैमान सुरु व्हायला आता थोडाच वेळ शिल्लक होता ...

भोपाळ  दुर्घटना ... भाग तिसरा

# मृत्यूचे थैमान ...

रात्रपाळी सुरु झाली. रहमान आणि इतर सहकारी घरी निघून गेले होते. रात्री 11 वाजता रात्रपाळीचे कामगार कामावर आले. सुमन डे , शकील कुरेशी हे दोन सुपरवायझर आणि व्ही. एन. सिंग , मोहनलाल वर्मा आणि इतर दोन ऑपरेटर्स ... असे एकूण सहा जण कंपनीत होते. कामावर पोहोचल्यावर सुमनने आपल्या नियंत्रण कक्षात लावलेल्या डायलवर एमआयसी च्या टाकीचे प्रेशर चेक केले... 2 psig ! ... म्हणजे सर्व काही नियंत्रणात होते. तो आणि इतर सर्व छोट्या कँटीन मध्ये विड्या ओढत बसले ...

मध्यरात्री 12.30 वाजता अघटित घडायला सुरुवात झाली. एमआयसी च्या टाकीत शिरलेल्या पाण्याची एमआयसी बरोबर रासायनिक क्रिया सुरु होऊन अतिप्रचंड उष्णता आणि वायू तयार झाले होते. या वायूंच्या प्रचंड प्रेशरमुळे टाकीत शिरलेले पाणी उलट्या दिशेने वेगाने वाहत रिएक्टर मध्ये येत होते. सोबत विषारी वायूंना घेऊन येत होते...

मोहनलाल ला एमआयसी चा वास येऊ लागला. परंतु कुरेशी ने त्याची थट्टा सुरु केली. " बंद फॅक्टरी में ऍक्सिडेंट नहीं होतें !" परंतु काहीच मिनिटांत सर्वांचे डोळे चुरचुरू लागले. त्याही परिस्थितीत कुरेशी शांत होता ! " अरे हुआ रहेगा थोडा लीक . पहले चाय तो खतम कर ले !!!" कुरेशी हातातला चहा संपवत होता... इतक्यात सुमनची नजर डायलवर पडली... 30

psig ! हे प्रेशर प्रचंड होते... सुमन आणि वर्मा यांनी पहिल्या टाकीच्या वर बसवलेला डायल तिथे जाऊन चेक करायचे ठरवले. दोघांनी संरक्षक मुखवटे चढवले. दोनच मिनिटांत दोघे पहिल्या टाकीजवळ पोहोचले. आतून घुसळण्याचा आवाज येत होता ! आच्छादनावर बसवलेली डायल 55 psig प्रेशर दाखवत होती ! मुख्य म्हणजे त्या डायलवरचे सर्वात शेवटचे डिजिट्स 55 होते ! काटा त्यापुढे सरकूच शकत नव्हता ....

कुरेशी तिथे पोहोचला होता. तो भयचकित झाला . बंद कंपनीत अपघात होऊ शकतो हे आता त्याला समजले होते. त्याही परिस्थितीत त्याने डोकं चालवायला सुरुवात केली. पहिल्या टाकीला वाचवणं शक्यच नव्हते . परंतु दुसऱ्या टाकीला पहिल्या टाकीशी जोडणारी झडप बंद केली तर तिला वाचवता येईल ... त्याने झडप बंद केली. परंतु त्यामुळे पहिल्या टाकीतले प्रेशर आणखी वाढत होते. आवरणाला तडे जात होते ! सर्वांनी पळ काढला. पळता पळता जोराच्या आवाजामुळे दचकून त्यांनी मागे वळून पहिले... टाकीचे आवरण फुटून आजूबाजूला विखरून पडले होते. त्यातून टाकी रॉकेट सारखी बाहेर येऊन जमिनीवर कलंडली होती... प्रेशरमुळे तिला तडे जातच होते ... आणि आता त्यातून मोठमोठे वायूंचे ढग बाहेर पडत होते ...

कुरेशीने वाऱ्याची दिशा पाहिली. तो मनातून चरकला ! वारा दक्षिणेकडे स्टेशनच्या आणि जुन्या शहराच्या दिशेने वाहत होता. वस्तीतल्या लोकांना धोक्याचा इशारा देणे गरजेचे होते. त्यासाठी कारखान्याचा भोंगा होता . परंतु त्याला स्वतःचा आणि इतर सहकाऱ्यांचा जीव वाचवणं महत्वाचं वाटलं. त्या सर्वांनी उलट्या म्हणजेच उत्तरेच्या दिशेने पळ काढला. कसेबसे खोकत , ओकत , धडपडत यांनी त्या कारखान्यातून स्वतःची सुटका करून घेतली.

विषारी वायूंनी आपले काम सुरु केले होते. एमआयसी , फॉस्जिन , मिथाईल अमाईन आणि हायड्रोजन सायनाईड हे ते विषारी वायू होते. एमआयसी हवेपेक्षा जड होता. तो आसपासच्या वस्तीत पसरला. एकाएकी लोक खोकू लागले. ओकू लागले. रक्ताच्या उलट्या करून त्यातच कोसळून पडू लागले. सगळीकडे धावाधाव पसरली होती. एमआयसी मुळे लोकांची दृष्टी गेली. त्यामुळे आणखी हाहाकार उडाला. मिथाईल अमाईनच्या गुदमरून टाकणाऱ्या वासामुळे लोक तडफडत होते. हळूहळू मरणाऱ्यांची संख्या वाढत होती... रात्री दीड वाजता बरेच लोक झोपेतच मरण पावले !

हायड्रोजन सायनाईड ने ज्यांना गाठले होते , त्यांना तुलनेने कमी त्रासाला सामोरे जावे लागले... हा अतिविषारी सुंदर वायू पहिल्या श्वासात जर फुप्फुसात गेला , तर पुढचा श्वास घेण्याची तो तसदीच देत नाही !!! याच्या तडाख्यात येणारे लोक सेकंदातच चालता चालता कोसळून पडत होते...

अनेकांचे प्राण घेऊन त्या राक्षसाची भूक भागत नव्हती... त्याला आणखी मोठा घास घ्यायचा होता ... त्यासाठी तो वेगाने दक्षिणेकडे सरकत होता... रेल्वे स्टेशनवर ट्रेनची वाट पाहणाऱ्यांना कल्पना नव्हती की ते नेमकी कशाची वाट पाहत आहेत ... आणि ... 45 डब्यांची प्रवाश्यांनी खचाखच भरलेली  एक्सप्रेस वेगाने भोपाळकडे येत होती ...

भोपाळ दुर्घटना ... भाग चौथा

# राक्षसाची शांती...

अनेक लोकांचे प्राण घेऊन आणि त्यापेक्षा अधिक लोकांना मृत्यूच्या दारात पोहोचवून तो विषारी ढग रेल्वे स्टेशनकडे वळला ... स्टेशनवर लोक गाडीची वाट पाहत होते. कुणी चहा पीत होते , काही समोसे खात होते. लहान मुलं खेळत होती. शर्मा नावाचे स्टेशन मास्तर आपल्या केबिनच्या बाहेर रिझर्वेशनची लिस्ट तपासत होते. गोवर्धन एक्सप्रेस यायला आता थोडाच वेळ राहिला होता. इतक्यात लोकांचे डोळे चुरचुरायला लागले. श्वास जड व्हायला लागला. शर्मा सुद्धा डोळे चोळत लिस्ट बघत होते. इतक्यात त्यांच्या केबिन मधला फोन खणखणला. शर्मांनी केबिनमध्ये जाऊन फोन उचलला . रेल्वे कॉलनी मधून ऑफिसरचा फोन होता. " शर्मा , अनर्थ घडलाय ! कार्बाईड मधून विषारी वायूंची गळती झालीय. इथे अनेकांचे प्राण गेलेत. पुढचा नंबर कदाचित तुमचा असेल. तो वायू स्टेशनच्या दिशेने येतोय ! तेव्हा तयार राहा... "

शर्मांनी फोन ठेवला. त्यांना कार्बाईड ने दिलेला मास्क आठवला. परंतु स्टेशनवर अनेक लोक होते. आणि मास्क फक्त चार पाच ! किती जणांना पुरणार होते ? शर्मांनी स्वतः सुद्धा मास्क वापरला नाही. खिशातून रुमाल काढून पाण्याने भिजवून त्यांनी नाकातोंडावर बांधला. आणि केबिनमधून बाहेर पडले. बाहेर पडल्यानंतर त्यांना जे दृश्य दिसले ते त्यांना अनेक दिवस छळत राहिले. लोक वेदनेने रडत होते रक्ताच्या थारोळयात अनेक लहान लहान मृतदेह आपली खेळणी कवटाळून पडले होते... प्रत्येक क्षणाबरोबर परिस्थिती हाताबाहेर जात होती. त्यांना

अचानक आठवण झाली... गोवर्धन एक्सप्रेस येण्याची वेळ झाली होती. तिला वेळेत माहिती दिली तर मोठा अनर्थ टाळता येईल... त्यांनी आरोग्यमंत्र्यांना संपर्क केला. मंत्री चिडले ! " कार्बाईड तर्फे निर्वाळा मिळाला आहे. वायू इतके विषारी नाहीत . लोकांना नाकातोंडावर रुमाल बांधायला सांगा. आणि कमीतकमी श्वास घ्यायला सांगा .... गाडी अडवू नका."

शर्मा हतबल झाले. अधिकाऱ्यांकडून ऑर्डर्स मिळत नव्हत्या . पण गाडी भोपाळमध्ये आली असती तर अनेक निरपराध लोकांचे प्राण गेले असते... त्यांनी भोपाळ आधीच्या विदिशा स्टेशन मास्तर ला फोन लावला. समोरून उत्तर आले ,"गाडी विदिशाहून निघालीय." शर्मा विचार करू लागले. विदिशा आणि भोपाळ च्या मध्ये एकही सिग्नल नव्हता . त्यांनी तातडीने दोन हमाल बोलावून घेतले. त्या दोघांना लाल रंगाचे कंदील हातात घेऊन रुळांवर उतरून गाडीच्या दिशेने धावायला सांगितले.

पटेल आणि परिदर नावाचे दोन हमाल हातात लाल कंदील घेऊन धावत निघाले. स्टेशनपासून बऱ्याच दूर अंतरापर्यंत ते पोहोचले. परंतु वाटेत त्या दोघांना त्या विषारी ढगांनी गाठले. श्वास कोंडत होता. धाप लागत होती. डोळ्यांसमोर काही दिसत नव्हते. पायातले बळ खचत चालले होते. हातातले कंदील हिंदकळत होते... तशातही ते चालत होते ! गोवर्धनच्या मोटरमनला ते दुरून दिसले. परंतु दोन बेवडे पिऊन दंगा करत आहेत ! त्याने वेग कमी केला नाही... रुळांवर रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या... स्टेशनवर शर्मा नाकावर रुमाल बांधून चांगल्या बातमीची वाट पाहत होते. परंतु प्रत्यक्षात त्यांना दिसले ... गोवर्धन एक्सप्रेस दिमाखात हॉर्न वाजवत स्टेशनवर प्रवेश करत होती !!!

शर्मांनी ओळखले. त्यांची दोन्ही माणसं ट्रेन रोखायला अपयशी ठरली आहेत... परंतु अजूनही वेळ गेलेली नव्हती. त्यांनी लगेच केबिनमध्ये जाऊन घोषणा सुरु केल्या. " कुणीही भोपाळ स्टेशनमध्ये उतरू नये ! विषारी वायूच्या गळतीमुळे लोकांना त्रास होत आहे. गाडी लगेचच सुटेल."

घोषणा संपवून ते केबिनबाहेर आले. आपल्या घोषणेचा काय परिणाम झाला आहे हे पाहण्यासाठी ... परंतु जणू काही प्रवाशांनी ती घोषणा ऐकलीच नव्हती ! लोक स्टेशनवर उतरले होते आणि जे घडू नये ते घडत होते... गाडी तिथून लगेच सुटणे गरजेचे होते. त्यांच्या मनात एक भयानक शंका आली. जर मोटरमनला विषबाधा झाली तर ??? इथे क्षणात नरक अवतरेल ! या कल्पनेने शहारून ते हातात हिरवा झेंडा घेऊन मोटरमनच्या दिशेने धावले. मार्गात आलेली प्रेतं ओलांडत , तुडवत , लोकांच्या विव्हळण्याकडे दुर्लक्ष करत ... त्यांनी मोटरमनला झेंडा दाखवत म्हटले ," ऑल क्लियर . गाडी लगेच निघू दे !" एकदाची गोवर्धन एक्सप्रेस भोपाळमधून निघाली...

गाडी निघून गेली. परंतु स्टेशनवर खरंच नरक पसरला होता. जे थोडेफार जिवंत होते ते काही ऐकण्याच्या आणि समजण्याच्या पलीकडे गेले होते. रुमाल बांधण्याच्या आणि कमीत कमी श्वास घेण्याच्या सूचना ते कुणाकुणाला देणार होते ? काहीच न सुचून शर्मा केबिनमध्ये धावले. फर्स्ट एडचा डबा उघडून दिसतील ती सर्व औषधं त्यांनी कोटाच्या खिशात भरून घेतली. पण प्रेतांवर काय उपचार करणार ? हतबलतेमुळे आणि वायूंच्या परिणामामुळे ते बेशुद्ध होऊन कोसळले...

3 डिसेंबर 1984 ... हॉस्पिटल्स लोकांनी भरून गेली. प्रत्येकाचा रेकॉर्ड ठेवणे शक्य नव्हते. उपचार काय करावेत हेही माहित नव्हते. कार्बाईडच्या अधिकृत डॉक्टर . लोया यांना संपर्क केला गेला. त्यांनी सांगितले , " एमआयसी या वायूसाठी कोणताही उपाय , उतारा उपलब्ध नाही.... डोळयांवर ओल्या कापसाचे बोळे ठेवा. जळजळ कमी होईल..."

फक्त इतकंच ? परंतु प्रत्यक्षात ऑक्सिजन मास्क लावूनही काही फायदा नव्हता. हॉस्पिटलची शवागार भरून वाहत होती. प्रेतं उघड्यावर पडून होती. विषबाधा झालेली ती प्रेतं आता सडायला लागली होती....

मित्रांनो , भोपाळच्या दुर्घटनेची मुख्य घटना इथे संपतेय. कायदेशीर कारवाई काय झाली ? अँडरसन कसा कचाट्यातून सुटला ? गुन्हा नेमका कुणावर दाखल झाला ? त्यावेळच्या आरोग्यमंत्र्यांनी नेमकी काय भूमिका घेतली ? आणि सर्वात मुख्य ... दुसऱ्या टाकीतल्या 20 टन एमआयसी चे काय झाले ?

या प्रश्नांची उत्तरं जाणून घेण्यात ज्यांना इंटरेस्ट आहे , फक्त त्यांच्यासाठी लवकरच याबद्दल लिहेन. अगदी थोडक्यात. परंतु ज्यांना फक्त घटनेची कारणं आणि प्रत्यक्षात घटना जाणून घ्यायची आहे त्यांच्यासाठी भोपाळ ची पोस्ट संपली आहे...

भोपाळ दुर्घटना ... भाग पाचवा (अंतिम )

# न्यायनिवाडा ...

भोपाळची घटना संवेदनशील माणसाला हळवं करणारी होती... परंतु आज मी जे काही लिहिणार आहे ते बुद्धिमान माणसाला चक्रावून सोडणारे आहे !

मध्य प्रदेश चे मुख्यमंत्री अर्जुनसिंग यांनी घटनेच्या रात्री स्वतःच्या गावाबाहेरच्या बंगल्यात बसून भोपाळच्या पोलीस आयुक्तांना ऑर्डर्स दिल्या होत्या की भोपाळमधून बाहेर पळू पाहणाऱ्यांना अडवण्यात यावे ... रस्त्यारस्त्यावर नाकाबंदी करून प्रत्येकाला आपल्या घरीच राहण्यास भाग पाडण्यात यावे ... परंतु आयुक्त रणजितसिंग यांनी त्या सूचना फेटाळून लोकांना सुरक्षित स्थळी जाण्यास मदत केली. निवडणूका जवळ आलेल्या असताना आपले मतदार इतरत्र विखुरले जाऊ नये यासाठी मुख्यमंत्र्यांनी अशा ऑर्डर्स दिल्या होत्या !

4 डिसेंबर रोजी अँडरसन अमेरिकेतून भारतात आला. त्याला पोलीस बंदोबस्तात भोपाळ मध्ये विमानाने आणले गेले. कंपनीच्या गेस्टहाऊस मध्ये नेऊन त्याला अटक केल्याचे जाहीर केले गेले. अर्जुनसिंग यांनी स्वतः ही बातमी प्रसारमाध्यमांना दिली. आणि तीन तासांनी फक्त 25 हजार रुपये जामीन घेऊन त्याला सोडण्यात आले. पुन्हा एकदा पोलीस बंदोबस्तात त्याला दिल्लीपर्यंत नेण्यात आले. तिथून तो अमेरिकेला रवाना झाला. 92, 120 बी , 278, 304, 426, 429 या कलमान्वये दुर्लक्षामुळे मनुष्यवध , वातावरण विषारी करणे , विषारी

पदार्थ हाताळण्यात निष्काळजीपणा असे गुन्हे त्याच्यावर दाखल होते. त्यासाठी आजन्म कारावासाची मागणी करण्यात आली होती.

वूमर भारतात आला. त्याने कंपनीच्या भारतातल्या अधिकाऱ्यांना प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. " एमआयसी इतका जास्त का साठवला होता ? सुरक्षेच्या यंत्रणा बंद का होत्या ? " परंतु सीबीआय ने त्याच्या चौकशीत हस्तक्षेप करून त्याला कंपनीच्या आवारात प्रवेश करण्यास बंदी घातली...

वूमर च्या सल्ल्याने उरलेले एमआयसी सेव्हिन बनवण्यासाठी वापरले गेले. त्यासाठी सर्व यंत्रणा सुसज्ज करून 16 डिसेंबर रोजी कंपनी पुन्हा चालू करण्यात आली. या प्रक्रियेला तीन दिवस लागले. अर्जुनसिंग यांनी जवळपासच्या सर्व नागरिकांना स्थलांतरित केले आणि भीतीचे वातावरण पसरवले. मात्र स्वतः 16 डिसेम्बरला कंपनीच्या आवारात हजर राहून मतांची खात्री करून घेतली...

1989 - 47 कोटी डॉलर्सची नुकसान भरपाई कंपनीने जाहीर केली.

15 मार्च 1985- भारतातील कृषी विभागाचे उपाध्यक्ष के.एल. कामदार यांनी वार्ताहरांच्या बैठकीत एक अहवाल सादर केला. त्यात असे म्हटले होते की

हा अपघात नसून मुद्दाम घडवण्यात आलेला एक घातपात होता. एका वर्करने आपल्या बॉसवर सूड उगवण्यासाठी मुद्दाम भरपूर पाणी रिएक्टर मध्ये सोडले होते. आणि

मुद्दाम सुरक्षा यंत्रणा निकामी केल्या होत्या . पुरावे म्हणून शोधपथकाला टाकीजवळ पडलेला पाण्याचा पाईप आणि रात्रपाळीच्या रजिस्टरमध्ये खाडाखोड मिळाली होती !!!

1991 - अँडरसन ला इंटरपोल तर्फे कोर्टाचे समन्स पाठवण्यात आले. परंतु तो त्याआधीच निवृत्त होऊन , देश सोडून फरार झाला होता. समन्स त्याच्यापर्यंत अजूनही पोहोचले नाहीय ...

"Those who lived are the unlucky ones - the lucky ones are those who died on that night."

*Gas survivor Rashida Bi, who lost five gas-exposed family members to cancers.*



“$500 is plenty good for an Indian”

*Dow Public Affairs Specialist Kathy Hunt, 2002, referring to the average compensation received by the Bhopal victims*











Image courtesy: Amnesty International © Raghu Rai / Magnum Photos






WANTED
by the
BHOPAL COURTS
for
HOMICIDE
Warren Anderson
(Former Chairman Union Carbide)
WE DEMAND HIS EXTRADITION
FROM THE UNITED STATES !!




© RAGHU RAI
















AP PHOTO




MAKE IN INDIA BUT REMEMBER BHOPAL
CHILDREN AGAINST DOW CARBIDE

# ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www.esahity.com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app. https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा. हे सर्व मोफ़त आहे.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com